भारतीय विद्या भवन

सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ५८

80/2024-25/935 DT:- 26/11/2024

परिपत्रक

सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना व विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. सकिर्ण/११२४/प्र.क्र.७२/ समन्वय दिनांक २२.११.२०२४ नुसार भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात भारतीय राज्य घटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विदयार्थी व नागरीकामध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६.११.२०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे सामुहीक वाचन करण्याबाबत आयोजन करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

तरी संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर व विदयार्थ्यानी दिनांक २६.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविदयालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ उपस्थित राहण्याचे करावे.

for प्र. प्राचार्य

प्रत : विभाग प्रमुख (स्थापत्य, यंत्र, विद्युत आणि प्रथम वर्ष)/प्र.प्रबंधक/ग्रंथपाल/परीक्षा नियंत्रक/पदव्युत्तर विभाग/प्र.आ.अधिकारी/भा.का.से. (स.प.अ.म.युनिट)

z:\user\२०२४\circular\परिपत्रक- सविंधान .docx

THE CONSTITUTION OF INDIA

Preamble

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;

and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

भारताचे संविधान

प्रास्ताविक



भारताचे लोक,

भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य

घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,

अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे

स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये

व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस

नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे

संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करुन स्वत: प्रत अर्पण करत आहोत.